# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.
## प्रकरण क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रामीण/४९०/२०१४/११

**तक्रार दाखल दिनांक :- १०/०२/२०१४**
**निकाल दिनांक :- १०/०४/२०१४**

**श्री,बाबुराव पांडुरंग पवार** **तक्रारदार**
**मु. पोस्ट कंरजखेडा,**
**ता. कन्नड, जिल्हा औरंगाबाद.**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित ग्रामीण मंडळ औरंगाबाद.**
**गैरअर्जदार**

**मंच सदस्य**

**श्री. वि. स. काबरा सदस्य**
**श्री. सु. कि. नरवडे सदस्य/सचिव**

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे.अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १०.०२.२०१४ रोजी औरंगाबाद मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २५.०२.२०१४ रोजी ठेवण्यात आली.

अर्जदार हे कृषि विज पंपधारक असुन त्यांनी ३ अश्वशक्ती विद्युत पंपाचे कनेक्शन दि.२२.०२.१९९६ रोजी घेतले आहे. व त्यांचा ग्राहक कमांक ५०३१००००७६१६ असा आहे, विज कनेक्शन घेतल्यापासुन अर्जदाराने गैरअर्जदारामार्फत देण्यात आलेली विज देयकाची रक्कम भरणा केलेली आहे,

परंतु मध्यतरीच्या काही काळात त्यांना विज देयक मिळालेले नाहीत . म्हणून विज बिल थकीत राहिलेले होते. अस अर्जदाराने आपल्या तक्रार अर्जात नमुद केले आहे . गैरअर्जदार कंपनीने कृषि संजीवनी योजना दि. ३१.०३.२००५ पर्यंतची थकबाकी सवलतीने भरल्यास काही रक्कम माफ करुन मिळेल अशी योजना होती. या अनुषंगाने गैरअर्जदार कंपनीकडून अर्जदारास देण्यात आलेले विज देयक रुपये ११७१४.५७ च्या बिलात सवलतीचे विज बिल रुपये ८७५०/- देण्यात आले, त्याचा भरणा अर्जदाराने एक रक्कमी ३१.०३.२००५ रोजी केलेला आहे. परंतु गैरअर्जदार कंपनीकडून सदर योजनेचा लाभ देण्यात आलेला नाही. कंपनीकडून दिलेल्या पुर्ण विज बिलाचा भरणा केल्यानंतर अर्जदाराकडे कुठलीही थकबाकी राहिलेली नाही. गैरअर्जदार विज कंपनीतील कर्मचारी अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार संगणकावरील विज बिलामध्ये फक्त रु. ४.०४ कमी भरल्यामुळे सदर योजनेचा लाभ देता येत नाही ,

सन २००५ मधील कृषि संजिवनी योजनेअतंर्गत लाभ न दिल्यामुळे पुढील कृषि संजिवनी योजना दि. ३१.१२.२०११ चा फायदा अर्जदारास घेता आला नाही, विज कंपनीकडून कृषि संजिवनी योजनेअंतर्गत दिलेले चुकीचे विज देयक फक्त रुपये ४.०४ कमी असल्यामुळे अर्जदारास योजनेचा लाभ मिळाला नाही. सदर योजनेचा अर्जदाराची काहीही चुक नसल्यामुळे माननीय मंचाने फायदा मिळवुन दयावा अशी विनंती अर्जदाराने केली आहे

गैरअर्जदार महावितरणतर्फे खालीलप्रमाणे युक्तीवाद करुन त्यांचे म्हणणे लेखी स्वरुपात मंचापुढे सादर केले आहे.

अर्जदार श्री. बापुराव पांडुरंग पवार. रा. कंरजखेडा यांनी कृषि संजिवनी योजनेचा लाभ घेण्यासाठी रु.८७५४/ भरणे आवश्यक असतांना त्यांने रु.८७५०/- भरणा केलेले आहे . सदर योजना संगणकीय प्रणालीनुसार राबवली गेली असल्यामुळे सदर ग्राहकांस या योजनेचा लाभ मिळाला नाही ही बाब धोरणात्मक असल्यामुळे गैरअर्जदार हे निर्णय घेऊ शकत नाही असे अधिक्षक अभियंता ( ग्रामीण ) महावितरण, औरंगाबाद यांच्या लेखी युक्तीवादात मंचासमोर सादर करण्यात आले . सदर युक्तीवादासोबत संगणकीयप्रणाली मार्फत देण्यात आलेले विज बिल सादर करण्यात आले .

वरीलप्रमाणे मंचासमोर सादर करण्यात आलेल्या अर्जदार व गैरअर्जदारातर्फे कागदपत्रांची या मंचाने पाहणी केली असता खालील बाबी निदर्शनास येतात.

अर्जदार यांनी गैरअर्जदार यांच्या कार्यालयाशी सन २००५ पासुन सातत्याने पाठपुरावा केलेला दिसुन येतो. सहाय्यक अभियंता उपविभाग कन्नड यांने त्यांचे पत्र क्रमांक ६७० दि. २९.०५.२००५ , २१८ दि.१३.०२.२००६ , १५५५ दि. १९.१२.२००६ अन्वये पत्रव्यवहार केलेला दिसुन येतो , तसेच सहाय्यक अभियंता, उपविभाग कन्नड यांनी त्यांचे पत्र क्रमांक १४९३ दि. ३०.०९.२००७ अन्वये मुख्य अभियंता ( औप ) औरंगाबाद यांना हि बाब कळविण्यात आलेली आहे, तसेच कार्यकारी अभियंता , कन्नड यांचे पत्र क्रमांक १४७२ दि.०४.०४.२००६ व ३७८४ दि. ३०.०८.२००६ अन्वये सहाय्यक संचालक , माहिती व तंत्रज्ञान विभाग यांना देखील अर्जदाराशिवाय इतरही एकुण ८५ ग्राहकांना अशाच कारणामुळे लाभ मिळू शकलेला नाही असे कळविले आहे व सोबत एकुण ८५ ग्राहकांची सविस्तर यादी सोबत जोडलेली आहे. सदर पत्राची प्रत मुख्य अभियंता ( वाणिज्य ) ,प्रकाशगड, मुंबई , मुख्य अभियंता ( औप ) औरंगाबाद व अधिक्षक अभियंता ( ग्रामीण ) औरंगाबाद व कार्यकारी अभियंता , विभागीय कार्यालय कन्नड यांना अग्रेषित करण्यात आली आहे. सदर पत्राच्या प्रती व एकूण ८५ ग्राहकाची यादी मंचासमोर सादर करण्यात आली .

मंचासमोर सादर करण्यात आलेल्या लाभ न मिळालेल्या ग्राहकांची यादीचे अवलोकन केले असता असे दिसुन येते कि, ग्राहकाकडून ०.०१ रुपये ते १२ रुपये कमी भरणा केल्यामुळे अश्या ग्राहकांना सदर कृषि संजिवनी योजनेचा लाभ दिला गेला नाही . सहाय्यक अभियंता, कन्नड यांनी सादर केलेला एकुण ८५ ग्राहकांच्या यादीमध्ये अर्जदार श्री. बापुराव पांडुरंग पवार यांचे नाव अनुक्रमांक ३५ वर दिसुन येते .

अर्जदार श्री. बापुराव पांडुरंग पवार यांना देण्यात आलेले विज बिल मंचाने तपासले असता असे दिसुन येते कि अर्जदाराने ८७५४.०४ रुपये भरावयाचे होते परंतु भरणा केलेली रक्कम ८७५०/- दि. ३१.०३.२००५ संबंधित रोखपालाने स्विकारलेली विज बिलावर मारलेल्या शिक्यावर दिसुन येते . अर्जदाराचे म्हणणे असे कि विज देयक स्विकारणा-या औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक शाखा करंजखेडा येथील रोखपालाने पुर्णाक देयकासाठी ८७५०/-. रुपये स्विकारले त्यामुळे अर्जदारांचा जाणिवपूर्वक कमी पैसे भरण्याचा उददेश दिसुन येत नाही .

गैरअर्जदार कंपनीने त्यांच्या नेमलेल्या विज देयक स्विकृती केद्रांना सदर योजनेचे महत्व लक्षात घेऊन बिलावर दर्शविण्यात आलेली संपुर्ण रक्कम भरुन घेणे बाबत सुचना देणे आवश्यक होते . देयक स्विकृती केंद्रांतील रोखपालाने पूर्णांक विज देयक म्हणून ४.०४ कमी स्विकारले यामध्ये ग्राहकाचा दोष दिसुन येत नाही व त्यामुळे अर्जदाराचे पुढील देयके व्याज व दंड आकारणीमुळे वाढले . .तसेच अर्जदाराने रुपये ८७५०/- एवढी रक्कम सदर योजनेचा लाभ मिळावा या उददेशापोटी भरलेली आहे उर्वरीत रुपये ४.०४ देखील ग्राहकांने निश्चीत भरले असते त्यामुळे अर्जदारांचा कमी रक्कम भरण्याचा जाणिवपूर्वक हेतु स्पष्ट होत नाही किंवा दिसुन येत नाही असे या मंचाचे मत आहे .

सहाय्यक अभियंता उपविभाग कन्नड यांनी सुध्दा अर्जदाराच्या तक्रारीनंतर सातत्याने वरीष्ठ कार्यालयाशी पाठपुरावा केलेला दिसुन येतो व सदर योजनेचा लाभ अर्जदारांना मिळावा हा हेतु स्पष्ट होतो .परंतु त्यांच्या अधिकार क्षेत्रात हि बाब येत नसल्यामुळे व वरिष्ठाने योग्य ती दखल न घेतल्यामुळे अर्जदार व इतर ग्राहक कृषि संजिवनी योजनेचा लाभ घेण्यापासुन वंचित राहिले हि बाब स्पष्टपणे दिसुन येते त्यामुळे हा मंच पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे .

# आदेश

**१. गैरअर्जदार यांनी सक्षम अधिका-याच्या परवानगीने अर्जदारास कृषि संजिवनी योजना २००५ चा लाभ देण्यात यावा व त्यापुढील चालु देयक कृषि संजिवनी २०११ च्या अंतिम मुदतीपर्यंत व्याज व दंड न आकारता एक महिन्याच्या आत देण्यात यावे .**

**२. अर्जदाराने कृषि संजिवनी २००५ पासुन पुढील कृषि संजिवनी २०११ पर्यंतच्या चालु देयकाची एकुण रक्कम एक महिन्याच्या आत एक रक्कमी भरावी.**

**श्री. वि. स. काबरा**
**सदस्य**

**श्री. सु. कि. नरवडे**
**सदस्य/सचिव**